दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • रविवार दि.२२ फेब्रुवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १७८ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Sunday 22 Feburary 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 178 • Pages 4 • Rate 4 Rs

### अजितदादांना मोदी, शहाच न्याय देऊ शकतात

**मुंबई**–राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज पुन्हा एकदा राष्ट्रीय राजधानी असणाऱ्या नवी दिल्लीत एक पत्रकार परिषद घेतली. त्यात त्यांनी केंद्रातील मोदी सरकारला पाठिंबा देणाऱ्या तेदेपाचे व्हीएसआर विमान कंपनीशी साटेलोटे असल्याचा आरोप करत केंद्रीय नागरी उड्डयण मंत्री राममोहन नायडू यांच्या राजीनाम्याची मागणी केली.तेदेपा व व्हीएसआरचे खूप घनिष्ठ आर्थिक संबंध आहेत. याच पक्षाचा खासदार केंद्रात उड्डयणमंत्री असल्यामुळे अजित पवारांच्या विमान अपघाताची चौकशी पारदर्शक होणार नाही. हा मंत्री डीजीसीएच्या माध्यमातुन कागपत्रांत हेराफेरी करू शकतो. त्यामुळे त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे, असे ते म्हणालेत. व्हीएसआर कंपनीला अनेक पॉवरफूल लोकांचा पाठिंबा असल्यामुळे स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या प्रकरणात लक्ष घातले पाहिजे, अशी मागणीही रोहित पवार यांनी यावेळी केली.

# मी शिंदेंना पुन्हा भेटेन, काय चर्चा करायच्या त्या करा!:राज ठाकरेंचा भेटीवर संशय घेणाऱ्यांना टोला

## निकोप राजकारण करण्याचा सल्ला;प्रत्येक गोष्टीकडे तिरस्काराने पाहण्याची गरज नाही

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज आपण मुंबईसह विविध शहरांतील समस्यांच्या मुद्यांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट घेतल्याचे स्पष्ट केले. आज निवडणुका संपल्या आहेत. आता एकनाथ शिंदे सत्तेत आहेत. त्यांना काही सूचना करायच्या असतील, चांगल्या गोष्टी करवून घ्यायच्या असतील तर त्यांना भेटू नये का? मी त्यांना पुन्हा भेटेन. तुम्हाला काय चर्चा करायच्या त्या करा, असे ते शिंदेंसोबतच्या भेटीत राजकारण शोधणाऱ्यांना टोला हाणताना म्हणालेत.राज ठाकरे यांनी गुरुवारी सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीविषयी राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या अटकळी व्यक्त केल्या जात आहेत. विशेषतः ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या प्रकरणी राज यांच्यावर टीका केली होती. राज ठाकरे यांनी आज मनसेच्या बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना या भेटीवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, आपल्याकडे आता पूर्वीसारखे निकोप राजकारण राहिले नाही. आज कुणी कुणाला भेटल्यानंतर त्यात युत्या, आघाड्याचे राजकारण शोधले जाते. आता ३ वर्षांनंतर निवडणुका आहेत. आता तर तशी परिस्थितीही नाही. आता निवडणुका संपल्यात. आज ते (शिंदे) सत्तेत आहेत. आम्हाला त्यांना काही सजेशन द्यायचे असतील, चांगल्या गोष्टी करून घ्यायच्या असतील, तर त्यांना भेटू नये का?प्रत्येकवेळी त्यात काहीतरी शोधलेच पाहिजे याची काहीच आवश्यकता नाही. उद्या मी मुख्यमंत्र्यांनाही भेटेन. आज मुंबई, पुणे, ठाणे आदी अनेक शहरांत अनेक प्रश्न आहेत. या प्रश्नांवर आम्हाला जे वाटते ते सांगणे गरजेचे नाही का? तुम्ही (पत्रकार) त्या दिवशी तिकडे असता तर तिथेच बोललो असतो.**

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज ठाकरे पुढे म्हणाले, सध्या आपल्या शहरांची परिस्थिती अत्यंत बिकट व भयावह स्थितीत पोहोचली आहे. त्यातल्या सर्वात महत्त्वाच्या भागाकडे आपण पाहत नाही. आपल्याकडे रस्ते बांधणे, पूल व उड्डाणपुले बांधणे यालाच विकास म्हणतात. मला वाटते की, ही सूज आहे. त्याने अजून काही बाळसे धरले नाही. आपल्याकडे फ्लायओव्हर, पूल आदी सर्व गोष्टी चांगल्या व्हाव्यात. पण आपण मूळ गोष्टींना हात घालतच नाही. आज मुंबईसह सर्वच शहरांत सगळीकडे रिडेव्हलपमेंट सुरू आहेत. पूर्वी जिथे ४०-५० माणसे राहत होती, तिथे आज ४०० लोक राहत आहेत. जागा तेवढीच आहे. रस्तेही तेच आहेत. अशा सगळ्या परिस्थितीत आज अनेकांकडे अनेक गाड्या आहेत. त्या गाड्या आज पार्किंगमध्ये न जाता रस्त्यावर उभ्या राहत आहेत.या सगळ्या गोष्टींना कुठेतरी शिस्त आली पाहिजे. आज आरटीओकडे मोठ्या संख्येने गाड्या रजिस्टर होत आहेत. त्या गाड्या रस्त्यावर येत आहेत. यामुळे सगळीकडे जॅम होत आहेत. शहरात येणारी माणसे व गाड्या थांबत नाहीत. आपण हे प्रकरण कुठे नेणार आहोत? मागे मुख्यमंत्र्यांना भेटून मी हीच गोष्ट सांगितली होती. तीच गोष्ट मी आता त्यांच्या (शिंदे) कानावर घातली. त्यानंतर त्यांनी लगेच ती गोष्ट भूषण गगराणी यांना फोन करून सांगितली. आज गाड्या कुठेही पार्क असतात. तुमच्या ओला, उबेरवाल्यांना तर अक्कलच नसते. या सर्वांना जरब बसत नाही, तोपर्यंत शहरांना शिस्त लागणार नाही, असे ते म्हणाले.मी या सर्व गोष्टी त्यांच्या कानावर घातल्या. परंतु लोकांचा त्यावर विश्वास बसत नाही. ते उगीचच त्यात काहीतरी असणार म्हणून शंका घेतात. तुम्हाला काय चर्चा करायच्या त्या करत बसा. मी त्यांच्याकडे या गोष्टींसाठी गेलो होतो. मी त्यांना फाईल दिली आहे. ती त्यांनी गगराणीकडे पाठवली आहे. त्यावर पुढे काय होईल हे गगराणीला विचारा.राज ठाकरे यांनी यावेळी बांगलादेशी घुसखोरांच्या मुद्यावरही आपले मत व्यक्त केले. ते म्हणाले, आपल्याकडे कुंपणच शेत खातंय. सगळ्या गोष्टींचा विचका झालाय.



या सगळ्या लोकांना आधार कार्ड, रेशन कार्ड देणारे लोक इथलीच आहेत. त्यांच्यावर कारवाई कोण करणार. येणाऱ्या माणसांच्या हाती तुम्ही सगळ्या गोष्टी देत आहात. हे देणारी माणसे आपलीच आहेत. त्यांच्यावर कारवाई करा. एखाद्या शहरामध्ये किती माणसे येऊ शकतात, किती माणसे राहू शकतात त्याला काही आकार-उकार आहे की नाही. कुणी कधीही उठून कोणत्याही शहरात राहण्यासाठी जायचे असे होता कामा नये. या गोष्टींचा राज्य व केंद्राने विचार केला पाहिजे.आज आपण ज्यांच्याकडे चांगली शहरे म्हणून पाहतो, ती बरबाद होतील. होणारच आहेत. राज्याचा नागरीक, एका पक्षाचा अध्यक्ष व विरोधी पक्ष म्हणून काही गोष्टी सत्ताधाऱ्यांना सांगणे गरजेच्या होत्या. त्यासाठी मी त्यांना भेटलो. मी त्यांना पुन्हा भेटेन. त्यावर तुम्हाला राजकारणाच्या काय चर्चा करायच्या त्या करा.महाराष्ट्रात पूर्वी एक निकोप राजकारण होते. निवडणुका संपल्यानंतर सर्वजण एकमेकांना भेटायचे. त्यात त्यांचे एकमेकांशी बोलणे व्हायचे. या सगळ्या गोष्टी आता बंद झाल्या आहेत. संपल्या आहेत. आता प्रत्येक गोष्टीकडे तिरस्कारानेच पाहिल्या जातात. हे असे चालणार नाही. त्यातून हाताला काही लागणार नाही. मला असे वाटते की, विरोधी पक्षांनी विरोधी पक्षाची भूमिका चांगल्या प्रकारे पार पाडली पाहिजे. जिथे सरकार चुकेल तिथे त्याला ठणकावले पाहिजे. उद्या आम्ही सरकारमध्ये असू. त्यामुळे आता सरकारमध्ये असलेल्यांनी उद्या हीच गोष्ट केली पाहिजे. या पद्धतीने राज्य चालले पाहिजे. तरच लोकांच्या हाताला काही लागेल, अन्यथा काहीच लागणार नाही.पत्रकारांनी यावेळी अजित पवारांच्या निधनाविषयी व्यक्त करण्यात येणाऱ्या शंकाकुशंकांविषयी राज ठाकरे यांना प्रश्न केला. पण त्यांनी त्यावर बोलण्यास नकार देत तेथून काढता पाय घेतला.

# अजित पवारांचा मृत्यू अपघाती वाटत नाही काँग्रेस नेते वडेट्टीवार यांनी व्यक्त केला संशय

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी अजित पवारांच्या विमानाचा ब्लॅकबॉक्स जळाच्या मुद्यावर संशय व्यक्त केला आहे. अजित पवारांच्या अपघाताविषयी वेगवेगळ्या शंकाकुशंका व्यक्त केल्या जात आहेत. या प्रकरणी ब्लॅकबॉक्स खराब झाला किंवा त्यातून काहीही माहिती प्राप्त होत नाही असे म्हटले जाते तेव्हा निश्चितच दाल में कुछ काला हैं असा संशय येतो, असे ते म्हणालेत.अजित पवार यांचे गत २८ जानेवारी रोजी बारामतीत झालेल्या एका विमान अपघातात मृत्यू झाला. तेव्हापासून या अपघाताविषयी संशय व्यक्त केला जात आहे. अनेक नेत्यांनी हा अपघात नसून, घातपात असल्याचा दावा केला आहे. त्यात आता काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांची भर पडली आहे. विजय वडेट्टीवारांनी मंगळवारी या प्रकरणी बोलताना अजित पवारांचा मृत्यू अपघात वाटत नाही असा दावा केला. ते म्हणाले, अजित पवारांचा मृत्यू अपघाती आहे की घातपात आहे याविषयी देशभरात खूप चर्चा सुरू आहे. अजित पवारांचा मृत्यू हा काही अपघात वाटत नाही.याविषयी ज्या काही शंका उपस्थित



झाल्यात त्यात काही प्रमाणात तथ्य वाटते. ब्लॅक्सबॉक्स खराब झाला आहे किंवा त्यातून काही माहिती प्राप्त होत नाही असे समोर येते तेव्हा त्याचा अर्थ दाल में कुछ काला हैं असा लावला जातो, असे ते म्हणाले.दुसरीकडे, सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांनीही या प्रकरणी आपला संताप व्यक्त केला आहे. ब्लॅकबॉक्समधील माहिती समोर येत नाही म्हणून तुम्ही तो परदेशात पाठवणार. परत १५-२० दिवस घेणार. नवीन कुठला तरी हा पुरावा सापडत नाही किंवा हे सापडत नाही हे सांगणार. अशा अनेक गोष्टी ज्या आहेत त्या खरेच खूप संशयाच्या आहेत, असे त्यांनी म्हटले आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनीही या प्रकरणाच्या संथगतीने होणाऱ्या तपासावर संशय व्यक्त केला आहे. अजित पवारांच्या अपघाताला २० दिवस झाले, पण अजूनही तपासाला वेग आला नाही. केवळ व्हीएसआर कंपनीला पुरावे नष्ट करता यावेत म्हणून तर उशीर होत नाही ना? की कंपनीला कुणाचा वरदहस्त आहे, हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. आज ब्लॅकबॉक्स खराब झाल्याबाबत जी काही माहिती समोर येत आहे, त्यावरून मी ५ दिवसांपासून वर्तवलेली शक्यता खरी होताना दिसत आहे. पण आम्ही दादांचा अपघात की घातपात याचे उत्तर मिळवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असे ते म्हणालेत.

# एसटीच्या सुरक्षेला डिजिटल कवच:नवीन सीसीटीव्ही प्रकल्पातून प्रवाशांना मिळणार अभेद्य संरक्षण-मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याच्या कानाकोपऱ्यात धावणाऱ्या 'लालपरी'च्या सुरक्षेला आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे बळ मिळणार आहे. दहशतवादी आणि समाजविघातक प्रवृत्तींच्या संभाव्य धोक्यांचा विचार करून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) एक महत्त्वाकांक्षी 'नवीन सीसीटीव्ही प्रकल्प' हाती घेतला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून एसटीच्या बसस्थानकांपासून ते विभागीय कार्यालयांपर्यंत सर्वच महत्त्वाच्या ठिकाणांवर डिजिटल नजरेचे अभेद्य जाळे उभारले जाणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.मंत्री सरनाईक म्हणाले की, प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पासाठी तब्बल



१११ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीच्या सहाय्याने एसटीच्या बसस्थानके, आगार, विभागीय कार्यशाळा, मध्यवर्ती कार्यशाळा, विभागीय कार्यालये तसेच मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी यांसारख्या संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. एकूण ६३३ ठिकाणी तब्बल ७०३५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून, यामुळे एसटीच्या प्रत्येक हालचालीवर सतत डिजिटल नजर राहणार आहे.

# अल्पसंख्याक प्रमाणपत्र वाटप प्रकरणात योग्य कारवाई होईल:मुख्यमंत्री फडणवीसांचा इशारा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात गाजत असलेल्या ७५ शिक्षण संस्थांना देण्यात आलेल्या अल्पसंख्यांक प्रमाणपत्र प्रकरणाची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली असून, या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या घोटाळ्यात मंत्रालयातील एका उपसचिवाचे नाव समोर आल्याने प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. प्रमाणपत्र वाटपात ज्यांनी कोणी अनियमितता किंवा गडबड केली असेल, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी आज स्पष्ट केले.उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारी रोजी विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. या धक्कादायक घटनेनंतर राज्यभर शोककळा पसरली होती. मात्र या दुर्घटनेनंतर काही तासांतच मंत्रालयात एक वेगळंच प्रकरण घडल्याची माहिती समोर आली. अल्पसंख्याक विकास विभागाकडून राज्यातील ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र देण्यात आले. विशेष म्हणजे, ही प्रक्रिया मागील वर्षी ऑगस्टपासून स्थगित ठेवण्यात आली होती. तरीही अजित पवार यांच्या निधनानंतर लगेचच या प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आल्याने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने याची दखल घेतली. ७५ शाळांना देण्यात आलेल्या अल्पसंख्याक दर्जाला स्थगिती देण्यात आली. यामध्ये ज्यांनी कोणी गडबड केली असेल, त्यांच्यावर कारवाई होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.

मुंबईत १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान जिओ वर्ल्ड सेंटर येथे देशातील पहिली 'मुंबई क्लायमेट वीक' (चउथ) परिषद सुरू झाली असून, हवामान बदल आणि शाश्वत विकासाच्या दिशेने महाराष्ट्राने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. महाराष्ट्र शासन आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी ते माध्यमांशी बोलत होते.दरम्यान, 'ग्लोबल इकॉनॉमिक कोऑपरेशन' या तीन दिवसीय शिखर परिषदेचाही आज मुंबईत प्रारंभ झाला. जागतिक अर्थव्यवस्थेत सुरू असलेल्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर विविध देशांमध्ये सहकार्य आणि नव्या पुरवठा साखळ्या (सप्लाय चेन) निर्माण करण्याच्या दृष्टीने या परिषदेला विशेष महत्त्व असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. या परिषदेत देशाचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी उद्घाटन केले. पुढील तीन दिवसांत जगभरातील मान्यवर नेते या मंचावरून विचारमंथन करणार आहेत.



### लाईफ क्वॉलिटी सुधारण्यावर भर

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'मुंबई क्लायमेट वीक' (चउथ) परिषद मुंबईत सुरू झालेली आहे. दरवर्षी मुंबईत आयोजित केली जाईल. ३५ देशातून लोक याठिकाणी आलेले आहेत. विशेषत: क्लायमेट क्शन या विषयावर डेलिब्रेशन होतील. वेगवेगळ्या प्रकारचे अलायन्सस होतील. आज एमएमआरडीएने देखील काही चांगले अलायन्सेस क्लायमेट क्शनवर घेतलेले आहेत. आपल्याला पुढच्या काळात विशेषत: क्लायमेट चेंजचा सामना करत असताना ज्या प्रकारे हवेची गुणवत्ता, पाण्याची गुणवत्ता आणि लाईफ क्वॉलिटी ही सुधारायची आहे. त्यादृष्टीने ही कॉन्फरन्स अत्यंत महत्त्वाची आहे.

### शेती आणि स्टार्टअप्सना मिळणार बळ

शेती क्षेत्रावर हवामान बदलाचा वाढता परिणाम लक्षात घेता, या विषयावरही सकारात्मक चर्चा होत असल्याचे त्यांनी नमूद केले. शेतीवरील परिणाम कमी करण्यासाठी काही प्रभावी मॉडेल्स आणि नवकल्पनात्मक स्टार्टअप्स पुढे आले आहेत. त्याचा राज्यातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# संपादकीय

## संशयाचं धुकं

विमानाचा ब्लॅक बॉक्स आगीत जळाल्याची माहिती आल्याने या प्रकरणाच्या चर्चेत आणखी वाढ झाली. तथ्य किती किंवा शक्यता किती याचा विचार न करता अशा चर्चांत मग प्रश्नांची भर पडत जाते. सध्या नेमकं हेच सुरू आहे. ते सहजपणे दुर्लक्ष करण्यासारखं नाही.अजितदादांच्या अपघाती निधनाने सामान्य माणूस अजूनही बुचकळ्यात आहे. एखाद्या अनपेक्षित घटनेचा धक्का एवढा मोठा असतो, की घटना घडून गेल्यानंतरही बरेच दिवस ती घटना मनाला स्वीकारता येत नाही. सत्य कळत असतं, पण त्यावर विश्वास ठेवायला मन तयार नसतं. एका बाजूला अनपेक्षित, अविश्वसनीय घटना आणि त्यानंतर समाज माध्यमांवरून फिरत असलेल्या अजितदादांच्या अनेक चित्रफिती. त्यात भर आमदार रोहित पवार यांच्याकडून व्यक्त होत असलेल्या संशयाची. अपघात हे खरं तर अतार्किकच असतात. त्यामुळे, तर्काने त्यात अनेक प्रश्न उपस्थित होतच असतात. काही सर्वसामान्यांच्या मनात असलेले प्रश्न, काही तज्ज्ञांचे प्रश्न, आपल्याकडे प्रत्येक व्यवस्थेत असलेल्या अव्यवस्था आणि नेमक्या त्याच दिवशी घडलेल्या काही अपवादात्मक त्रुटी या सगळ्यांची गोळाबेरीज रोहित यांच्या प्रश्न आणि संशयात असल्याने त्या अपघाताभोवतीचं गूढ वाढत चाललं आहे. रोहित यांच्या आरोपवजा प्रश्नांना सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि प्रवक्ते आनंद परांजपे यांनी उत्तरं दिली. पण, तरीही रोहित यांच्या पत्रकार परिषदा थांबेनात आणि त्यांच्या समर्थनार्थ अजितदादांचे धाकटे चिरंजीव जय पवारही आले, तेव्हां राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी उत्तरं द्यायला सुरुवात केली. रोहित यांच्या नेमक्या प्रश्नांना खरे तर हवाई वाहतूक विभागाशी संबंधित यंत्रणांनी उत्तर द्यायला हवं होतं किंवा निदान तज्ज्ञांचे अहवाल येईपर्यंत वाट बघण्याचं आवाहन तरी करायला हवं होतं. पण, विमान ज्या खासगी कंपनीचं होतं, त्या कंपनीने आपल्या बाजूने अजून तरी कोणतीच वस्तुस्थिती उघड न केल्याने आणि हवाई प्रवासी वाहतूक विभागाशी संबंधित नियंत्रक संस्थांनीही अजून तपासातील प्रगती अधिकृतरीत्या जनतेसमोर न ठेवल्याने रोहित यांच्या प्रश्नांची धार वाढत चालली आहे. सर्वसामान्य माणसालाही त्यामुळे काही प्रश्न पडू लागले आहेत.अजितदादांच्या अपघाती निधनानंतर त्याविषयी पहिली शंका व्यक्त केली, ती पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी. ममता यांचा संशय पसरू नये आणि या दुःखद घटनेला वेगळं वळण लागू नये, तो राजकारणाचा विषय होऊ नये, यासाठी शरद पवार यांनी तातडीने माध्यमांसमोर येऊन खुलासा केला. पण, त्यानंतर ही जबाबदारी खुद्द त्यांचे नातू रोहित यांनीच घेतली! राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते, आमदार अमोल मिटकरी ही या अपघाताबाबत प्रश्न उपस्थित करणारी दुसरी राजकीय व्यक्ती होती. ममतादीदींनी विषय नंतर सोडून दिला. मिटकरीही फार बोलले नाहीत. पण, रोहित या संदर्भातील तांत्रिक व परिस्थितीजन्य माहिती गोळा करू लागले. खासगी गुप्तहेरांमार्फतही काही माहिती गोळा करणार असल्याचं त्यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केलं. मुंबई आणि दिल्लीत त्यांनी माध्यमांसमोर सादरीकरणही केलं आणि त्याला धरून रोज काही ना काही मुद्दे मांडत राहिले. त्यामुळे संशयाचं वादळ मनामनांत घोंघावतं आहे. घराघरांत त्याची चर्चा सुरू आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स आगीत जळाल्याचं सांगितलं गेल्याने अविश्वासात भर पडली आहे. तथ्य किती किंवा तथ्याच्या शक्यता किती, याचा विचार न करता अशा चर्चांत मग प्रत्येकाच्या डोक्यातील प्रश्नांची भर पडत जाते. सध्या नेमकं हेच सुरू आहे. ते सहजपणे दुर्लक्ष करण्यासारखं नाही.

रोहित पवार आणि अजितदादांचं कुटुंब तांत्रिकदृष्ट्या वेगवेगळ्या पक्षात आहेत. रोहित आणि अजितदादांच्या पक्षातील 'अन्य' नेत्यांचा राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या मुद्द्यावरही दादांच्या मृत्यूनंतर वाद झाला होता. त्यामुळे, रोहित यांच्या या आरोपांनाही त्या नेत्यांकडून त्याच पद्धतीने उत्तरं दिली जातील, असं वाटत असतानाच एके दिवशी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या पार्थ पवार आणि पक्षाचे नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटल्या. त्यांनी या अपघाताची सीबीआय या केंद्रीय यंत्रणेमार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी केली. अजितदादांनंतर सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री असताना, संपूर्ण पक्ष सत्ताधारी महायुतीत सहभागी असताना आणि फडणवीस यांच्यासोबत एकूण एक पक्षाचे मधुर संबंध असताना अचानक ही मागणी का व्हावी? रोहित यांना रोखण्यासाठी, पक्षांतील खदखद थांबवण्यासाठी, की हितचिंतक मतदारांना दिलासा देण्यासाठी? फडणवीस यांचा दिल्ली दौरा ठरला होताच. त्यामुळे, त्यांनीही या शिष्टमंडळाला 'माझी केंद्रीय गृहमंत्र्यांबरोबर भेट होणार आहे. आपली मागणी मी त्यांच्यापर्यंत नक्की पोहोचवतो' असं आश्वासन दिलं. पुढे काय? ते थोड्याच दिवसांत कळेल.राष्ट्रवादी काँग्रेसची दोन शकलं झाल्यापासून या दोन्ही पक्षातले संबंध त्या पक्षांच्या सर्वोच्च नेत्यांतील भावनिक संबंधांवर हेलकावे खात होते. दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाचा विषयही त्याचाच भाग होता. आपल्याबरोबरच्या नेत्यांचं काहीही मत असलं, तरी पक्षाच्या अगदी खालच्या थरातील कार्यकर्त्यांच्या आणि मतदाराच्या मनात काय आहे, याची कल्पना अजितदादांना होती. १२ फेब्रुवारीचा मुहूर्त त्यांनी म्हणूनच नक्की केला होता. महानगरपालिकेच्या निवडणुकीतील प्रचारसभांत ते या एकत्रिकरणाबद्दल उपस्थित जनसमुदायाला आश्वासित करत असत. त्याचे अनेक व्हिडीओ सध्या समाजमाध्यमांवर भरपूर फिरताहेत. राजकारण्यांसाठी राजकीय सोय सर्वाधिक महत्त्वाची असते. ते साहजिकही आहे. राष्ट्रवादीचे दोन भाग झाले, ते या सोयीसाठी आणि आता त्या पक्षाचे वरिष्ठ नेते एकत्रिकरणाच्या विचारापासून पक्षाला शक्य तितक्या लांब घेऊन जाऊ पाहताहेत, तेही त्यासाठीच. अपघाताबद्दलचे प्रश्न आणि त्याच्या चौकशीच्या मागण्या या सोयी - गैरसोयीचा भाग होऊ नयेत, एवढीच घराघरांतल्या सर्वसामान्य माणसाची अपेक्षा असेल.

# भिवंडीत बंडखोरी करणाऱ्या ६ नगरसेवकांवर कारवाई-रवींद्र चव्हाण



दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

भिवंडी महापालिकेच्या महापौर निवडीत आज अत्यंत नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. राज्याच्या राजकारणात महापालिका निवडणुकांनंतरचे सत्तासंघर्ष अद्याप सुरूच असून, भाजपचे बंडखोर उमेदवार नारायण चौधरी यांनी काँग्रेसच्या पाठिंब्यावर महापौरपदावर कब्जा मिळवला आहे. या अनपेक्षित युतीमुळे भिवंडीच्या स्थानिक राजकारणात मोठा उलटफेर झाला असून भाजपला स्वतःच्याच गोटातून धक्का बसला आहे.या निवडणुकीत केवळ बंडखोरीच झाली नाही, तर भाजपचे सहा नगरसेवक फुटल्याची माहिती समोर येत आहे. चंद्रपूर महापालिकेतील सत्तासंघर्षाच्या पार्श्वभूमीवर आता भिवंडीतही असाच राजकीय ट्विस्ट पाहायला मिळाल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. भाजपच्या अधिकृत धोरणांविरुद्ध जात नगरसेवकांनी बंडखोर उमेदवाराला साथ दिल्याने पक्षांतर्गत शिस्तीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.या सर्व प्रकारावर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी अत्यंत कडक शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. पक्षाच्या ध्येयधोरणांच्या विरोधात काम करणाऱ्यांवर आणि बंडखोरी करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे संकेत त्यांनी दिले आहेत. पक्षादेश (व्हिप) डावलणाऱ्या या सहा नगरसेवकांवर आता अपात्रतेची टांगती तलवार असणार आहे.रवींद्र चव्हाण म्हणाले, भिवंडीच्या महापौरपदाबाबत आमच्या चर्चा सुरू होत्या. त्यामध्ये भिवंडी महापालिका महापौरपदाबाबत कोणी अर्ज भरावा, याबाबत सुरुवातीला नारायण चौधरी यांच्या नावाची निवड करण्यात आली होती. पण नंतरच्या काळात काही घडामोडी घडल्या आणि हा विषय प्रदेश पातळीवर गेला. तेव्हा स्नेहा पाटील यांना ही उमेदवारी देण्याचे ठरले. त्यानंतर नारायण चौधरी आणि त्यांच्याबरोबर असणाऱ्या भाजपाच्या काही नगरसेवकांना बंडखोरी न करण्याबाबत समजावण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# काँग्रेस भवन मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

## नवी मुंबई मध्ये काँग्रेस संपली बोलणारांना चपराक

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

वाशी येथील काँगेस भवन मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संतोष सुतार, श्रीकांत पाटील, संतोष गव्हाणे, संतोष पाटील, दुर्योधन पारवे, तुकाराम कदम, प्रशांत वाघ, अन्वर हवालदार, रमेश मेस्त्री मुस्ताक काझी सुरेंद्र प्रसाद गुरुमुती' निकम प्रणित शेलार, हृषीकेश चव्हाण, शशांक शिंदे आदीसह मोठ्या संख्येने उपस्थित होते.संतोष सुतार आपल्या मनोगतात म्हणाले की, छत्रपती शिवाजी जयंती साजरी करत असताना आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे गुण अंगीकारणे गरजेचे आहे आणि तीच खऱ्या अर्थाने शिवाजी जयंती साजरी केली असे होईल. छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते असे का म्हटले जाते कारण की रयतेची काळजी ते घेत होते. शेतकरी जगाला तर रयत



जगेल त्यामुळे ते शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊ नये म्हणून त्यांनी त्यांच्या सैनिकांना शेतकऱ्यांच्या शेतातून न जाण्याचे आदेश दिले होते. कारण की शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊ नये घ्याची काळजी ते जातीने घेत होते. ते स्त्रियांचा सन्मान करीत होते. आपण सुद्धा आपल्या आईचा व बहिणीचा सन्मान करायला पाहिजे. त्यांच्या प्रथम गुरु ह्या त्यांच्या आई जिजाऊ होत्या. आपण सुद्धा आपल्या आईचे मोलाचे मार्गदर्शन घेऊन आईच्या आदेशाचे पालन केले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज महिलांचा आणि मुलांचा सन्मान करीत असत. मग ती शत्रूची जरी महिला असली तरी तिचा राजे सन्मान करीत असत. आज आपण शिव जयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांकडून महिलांचा व मुलांचा सन्मान करण्याचा बोध घेतला पाहिजे. तेव्हाच आपण छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती खऱ्या अर्थाने साजरी केली असे म्हणता येईल.

# रोहित पवारांच्या सुरक्षेची जबाबदारी राज्य सरकारने घ्यावी-सुप्रिया सुळे

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेनंतर निर्माण झालेल्या शंका-कुशंकांना आता नवे वळण मिळाले आहे. अपघात की घातपात, या चर्चेमुळे राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. या प्रकरणी अजित पवार यांचे पुतणे रोहित पवार सातत्याने प्रश्न उपस्थित करत आहेत. त्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांकडूनही काही शंका व्यक्त करण्यात आल्या. आता खासदार सुप्रिया सुळे यांनीही मौन सोडत या प्रकरणावर पहिल्यांदाच स्पष्ट भूमिका मांडली आहे.गेल्या महिन्यात २८ जानेवारी रोजी अजित पवार यांचे विमान कोसळले आणि त्यात त्यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली. मात्र काही दिवसांनंतर या दुर्घटनेविषयी अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागले. रोहित पवार यांनी तीन वेळा पत्रकार परिषद घेऊन तपासाच्या गतीबाबत नाराजी व्यक्त केली. त्यांनी काही तांत्रिक बाबी आणि संबंधित कंपनीबाबत शंका उपस्थित करत तपास अधिक वेगाने आणि निष्पक्ष व्हावा, अशी मागणी केली.या पार्श्वभूमीवर अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांनीही सामाजिक माध्यमांवर पोस्ट करून 'ब्लॅक बॉक्स' संदर्भात शंका व्यक्त केली. विमान दुर्घटनेत ब्लॅक बॉक्स सहजपणे नष्ट होऊ शकत नाही, असे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रातील जनतेला या घटनेचे संपूर्ण, पारदर्शक आणि निर्विवाद सत्य जाणून घेण्याचा हक्क आहे, असे त्यांनी लिहिले. तसेच संबंधित उड्डाण सेवा देणाऱ्या कंपनीवर बंदी घालण्याची मागणीही त्यांनी केली. त्यामुळे या प्रकरणातील चर्चेला आणखी धार मिळाली.

# भिगवण महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ च्या बहिःशाल शिक्षण मंडळ व येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली तीन दिवसीय 'डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या व्याख्यानमालेतून विद्यार्थ्यांना विचारांची नवी दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.व्याख्यानमालेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तानाजी मगर यांच्या हस्ते झाले. यावेळी संयोजक प्रा. संदीप साठे, डॉ. भास्कर गटकुळ, डॉ. प्रशांत चवरे, डॉ. अनिल बनसोडे, डॉ. राजेंद्र साळुंखे यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.'यशाचा पासवर्ड'ने झाली सुरुवात व्याख्यानमालेचे पहिले पुष्प पुणे येथील प्रा. मुबीन तांबोळी यांनी 'यशाचा पासवर्ड' या विषयावर गुंफले. यावेळी बोलताना ते म्हणाले, यश मिळवण्यासाठी केवळ जिद्द पुरेशी



नसते; शिस्त, सातत्य आणि योग्य नियोजनाची जोड अत्यावश्यक असते. तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात स्वतःची कौशल्ये सतत अद्ययावत ठेवणे हाच खरा यशाचा पासवर्ड आहे. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.'आनंदाची लयलूट'चा संदेश दुसरे पुष्प 'आनंदाची लयलूट' या विषयावर प्रा. मारुती यादव यांनी गुंफले. आनंद हा बाहेर शोधण्यापेक्षा आपल्या स्वभावात, छोट्या कृतीत आणि सकारात्मक दृष्टीकोनात शोधला पाहिजे, असा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या खुमासदार शैलीमुळे विद्यार्थ्यांनी व्याख्यानाचा मनापासून आनंद घेतला.सावित्रीबाईंच्या कार्याचा प्रेरणादायी आढावा तिसरे पुष्प बारामती येथील विद्या प्रतिष्ठान महाविद्यालयाचे प्रा. विजय काकडे यांनी ' सावित्रीबाई फुले या विषयावर गुंफले. सावित्रीबाईंनी शिक्षणासाठी सोसलेले कष्ट, स्त्रीशिक्षणासाठी केलेला संघर्ष आणि सामाजिक परिवर्तनातील त्यांचे योगदान आजच्या तरुणाईसाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सावित्रीबाईंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच तरुण पिढीने वाटचाल केली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपक्रम प्राचार्य डॉ. तानाजी मगर म्हणाले, 'डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला'सारखे उपक्रम विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देतात आणि त्यांच्यात सामाजिक जाणीव निर्माण करतात. अशा उपक्रमांचा विद्यार्थ्यांनी निश्चित लाभ घ्यावा.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संदीप साठे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सारिका पाटील यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. गोविंद अग्रवाल यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. अमोल वाघ, प्रा. श्याम सातार्ले, प्रा. भाऊसाहेब सकुंडे, प्रा. विनोद भुजबळ, प्रा. पद्माकर गाडेकर, प्रा. समीर बळे, प्रा. आरती काळंगे, प्रा. वर्षा दराडे, प्रा. भाग्यश्री हाके, प्रा. ऋजा वाघमोडे तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# थकीत मालमता कर न भरल्याने सील केलेला व्यवसाय परस्पर सुरु केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

## ५ लाख कर थकल्याने दिवा प्रभाग समितीची कारवाई

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

ठाणे महानगरपालीका, मालमत्ता कर वसुली विभाग, दिवा प्रभाग समितीचे कर निरीक्षक व टीमने कारवाई सुरु केली असून मालमत्ता कर आकारणी, हस्तांतरण प्रक्रिया, मालमत्ता धारकास नोटीस बजावणे, मालमत्ता अटकावणी करणे, अधिपत्र, जप्ती/वारंट बजावणे इत्यादी कामे पार पाडली जातात. (मालमत्ता क्र. ६१७२२११७) शबाना कंम्पाउंड, शिळ याचे मालक शकील गफार खान हे असुन त्यांचेकडुन हसरत खान याने सदर मालमत्ता भाडयाने घेतलेली आहे व तेथे लाकडाचे बाक्स बनविण्याचा व्यवसाय करत आहे. सदर मालमत्तेचा रु.५,०१,९८१/- इ. कर भरणा बाकी असल्याने मालमत्तेचे मालक हसरत खान यास मालमत्ता कर बाकी असल्याचे व




मालमत्ता कर न भरल्यास तीन दिवसामध्ये कायदेशीर कारवाई करण्याची १६७६/२०२६ प्रमाणे नोटीस देवुन देखिल मालमत्ता मालक यांनी मालमत्ता कर न भरल्याने मालमत्ता कायदेशीर नियमाप्रमाणे अटकावणी (सील) करून सदर मालमत्तेला अधिपत्र देवुन जप्ती व वारंट काढुन अटकावणी केली होती. सदर कारवाई करताना इसम नामे हसरत खान हे समक्ष हजर होते. दिंनाक १९/०२/२०२६ रोजी दुपारी सदर ठीकाणी हसरत खान हा मालमत्तेस केलेली अटकावणीस न जुमानता तेथे त्याचा व्यवसाय करत असल्याने आढळुन आले. प्रकरणी कर निरीक्षक व टीमने मालमत्ता क्र. ६१७२२११७ पत्ता शबाना कंम्पाउंड, शिळ-महापे रोड येथे जावुन पाहणी केली असता आम्हाला देखिल इसम नामे हसरत खान याने आम्ही मालमत्तेला केलेली अटकावणीस न जुमानता सदर ठीकाणी व्यवसाय करताना आढळला. मी हसरत खान यास त्याबाबत विचारणा केली असता त्याने सदर केलेल्या अटकावणीस विरोध केल्याचे कबुल केले.दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर मालमत्तेस अटकावणी केलेली असताना दिं.१३/०२/२०२६ ते दिं. १९/०२/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजताच्या दरम्यान इसम नामे हसरत खान याने अटकावणी तोडुन त्यामध्ये प्रवेश करून तेथे त्याचा व्यवसाय करत असताना मिळुन आला प्रकरणी याचेविरूदध् भारतीय न्याय संहिता कलम २२३,२२१,३२४ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गुरुजी फाउंडेशनतर्फे कोल्हापुरी माती बंधाऱ्याचे भूमिपूजन;आमदार राजेश पवार साहेब यांच्या हस्ते शुभारंभ

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**





शिवजयंतीचे औचित्य साधत गुरुजी फाउंडेशनच्या वतीने कारेगाव ते हरेगाव दरम्यानच्या नाल्यात उभारण्यात येणाऱ्या कोल्हापुरी माती बंधाऱ्याचे भूमिपूजन समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.शेतकऱ्यांच्या सिंचन व पाणीटंचाईच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना करण्याच्या उद्देशाने एक हात मदतीचा, प्रत्येकाच्या उन्नतीचा या ब्रीदवाक्याखाली फाउंडेशनकडून विविध विकासकामे राबविली जात आहेत. त्याच अनुषंगाने या कोल्हापुरी माती बंधाऱ्याचे काम हाती घेण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन कार्यसम्राट आमदार राजेश पवार यांच्या हस्ते करण्यात आले, तर अध्यक्षस्थानी उद्योजक व शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी होते.कार्यक्रमास राजेंद्र कंधारे (प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई), स्वाती दाभाडे (उपविभागीय अधिकारी, धर्माबाद), सुरेखा स्वामी (तहसीलदार, धर्माबाद), युवा उद्योजक संदीप पाटील कवळे, माजी सभापती दत्ताहरी पाटील चोळाखेकर, ज्येष्ठ नेते नागोराव पाटील रोशनगावकर, माजी नगराध्यक्ष सुभाष पेरेवार, डॉ. विक्रम देशमुख, पारसमल दर्डा, प्रभाकर पाटील पुयड, किशनदादा गायकवाड कुदळेकर (प्रदेश कार्यकारिणी सदस्य, महाराष्ट्र प्रदेश), बापुसाहेब येताळे (जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा नांदेड), अमोल ढगे (जिल्हाध्यक्ष कामगार आघाडी, भाजपा नांदेड), ज्ञानेश्वर सावंत (तालुका अध्यक्ष, भाजपा उमरी) यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचा प्रास्ताविक भाषणात गुरुजी फाउंडेशनचे अध्यक्ष तथा व्हि,पी, के, उद्योग समूहाचे सी,ई,ओ संदीप पाटील कवळे यांनी फाउंडेशनच्या विविध सामाजिक उपक्रमाचा लेखाजोखा सुस्पष्ट शब्दात सांगितला.कार्यक्रमात बोलताना प्रशासकीय अधिकारी मुख्यमंत्री कार्यालय राजेंद्र कंधारे यांनी सर्व कामे शासकीय नियम व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनच पुढे नेण्यात येतील, असे स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात मारोतराव पाटील कवळे यांनी मागील तीन वर्षांपासून फाउंडेशनमार्फत राबविण्यात येणाऱ्या नालासरळीकरण व कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या कामांचा आढावा घेतला. दरवर्षी पावसाळ्यात मातीचे बंधारे वाहून जात असल्याने शासनस्तरावर मजबूत व कायमस्वरूपी कोल्हापुरी बंधारे उभारावेत, अशी मागणी त्यांनी आमदार राजेश पवार साहेब यांच्या कडे केली.तसेच गोदावरी नदीच्या दोन्ही काठांवर वीजपुरवठ्याची व्यवस्था केल्यास शेतकऱ्यांना मोटारी बसवून सिंचनासाठी पाणी उपसा करता येईल, विहिरी व बोअरवेलची पाणीपातळी वाढेल आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्नही सुटेल, असे त्यांनी नमूद केले. गेली वीस वर्षे प्रलंबित असलेल्या उर्ध्व पैनगंगा कालव्याचे अर्धवट काम तातडीने पूर्ण करण्याची मागणीही त्यांनी केली.उद्घाटनपर भाषणात आमदार राजेश पवार यांनी गेल्या दहा वर्षांत मतदारसंघात झालेल्या विकासकामांचा लेखाजोखा मांडला. उर्वरित प्रलंबित कामे पूर्णत्वास नेण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगत लाईट व्यवस्था, कालव्याचे उर्वरित काम आणि कोल्हापुरी बंधाऱ्यांसाठी सर्वेक्षण करून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या असल्याचे त्यांनी आपल्या मनोगतात स्पष्ट केले.यापुढे शेतकऱ्यांसाठी पांदण रस्त्यांचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून, तिन्ही तालुक्यांतील पांदण रस्ते अतिक्रमणमुक्त करून शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपण स्वीकारत असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.या भूमिपूजन सोहळ्यामुळे धर्माबाद परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून, सिंचन व पायाभूत सुविधांच्या विकासासाठी सकारात्मक पाऊल उचलले गेल्याची भावना व्यक्त होत आहे.

# आज पासून वैरागड येथे भरणार माँ गोरजाई यात्रा महोत्सवाचे कार्यक्रम

दैनिक वादळ वार्ता
**वैरागड । प्रतिनिधी**



माना आदिम जमात मंडळ शाखा देलनलवाडी आणि मुंबई ग्रामसभा वाढोणा, भगवानपुर तसेच माँ गोरजाई जीर्णोद्धार सेवा समिती वैरागड यांच्या वतीने दि. २१ ते २२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत दोन दिवसीय वैरागड येथील गोरजाई मंदिरात यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २१ फेब्रुवारी रोजी सकाळी ०६ वाजता आराध्य दैवतांची मठपूजा व रात्री १० वाजता डहाका वादन व जागृती, दि. २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता आराध्य दैवतांची गावातून मंदिरापर्यंत पालखी मिरवणूक सकाळी ११ वाजता पारंपारिक नृत्य कार्यक्रम, दुपारी १२ वाजता मार्गदर्शन सोहळा तसेच ३ वाजता सत्कार समारंभ, सायंकाळी ४ वाजता समारोप व महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

आराध्य दैवताचे पूजन व मोठपूजन मार्कंडा येथील ह.भ.प. गरमळे महाराज, राजुरी येथील धारणे महाराज, चिचखेडा येथील मानकर महाराज, प्रभाकर सावसाकडे यांच्या शुभहस्ते पूजन होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माझी राज्यमंत्री रमेशकुमार गजबे उपस्थित राहणार आहे. उद्घाटन माजी आमदार कृष्णा गजबे यांच्या हस्ते होणार आहे. उपाध्यक्ष म्हणून मुंबई माना आदिम जमात मंडळ अध्यक्ष सुधाकर सोनवणे, प्रमुख अतिथी म्हणून मुंबई मा. आ. ज. मं सचिव मधुकर ढोक, मुंबई मा. आ. ज. मं संघटन सचिव भास्कर गायकवाड, नागपूर कृती समिती अध्यक्ष अरविंद चांदेकर, चंद्रपूर अध्यक्ष गुणवंत दडमल, उपाध्यक्ष म्हणून मुंबई मा. आ. ज. मं उपाध्यक्ष अरविंद दडमल, सल्लागार ड. वामनराव नन्नावरे, वैरागड सामाजिक कार्यकर्ता बाळाराम उर्फ भोलू सोमनानी, विशेष अतिथी म्हणून वैरागड सरपंच संगीता पेंदाम, उपसरपंच भास्कर बोडणे, माजी जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती विश्वास भोवते, विश्वनाथ राजनहिरे, आरमोरी माजी नगराध्यक्ष पवन नारनवरे, माजी जिल्हा परिषद सदस्य केशव गेडाम, वामन सावसाकडे, माजी अध्यक्ष शत्रुघन चौधरी, मनोहर गरमळे, सावरखेडा येथील गुणवंत दडमल, वैरागड को-ऑपरेटिव बँक रमेश भोयर, पघोडमारे, वसंतराव चौधरी, सुनील नन्नावरे, बापूजी घोडमारे, रमेश राणे, अनिल श्रीरामे, रतिराम चौधरी, गोविंदराव सावसाकडे, दिवाकर नन्नावरे, जीवन कुत्तरमारे, शत्रुघन नन्नावरे, बाळकृष्ण राजनहिरे, गिरीधर नन्नावरे, ब्रह्मपुरी येथील हनवते, विजय घरत, वाल्मीक ननावरे, प्रा. विजय बगडे, प्रा. प्रदीप बोडणे, सामाजिक कार्यकर्ते दत्तू सोमणकर, आरमोरी सार्वजनिक बांधकाम विभाग इं. प्रवीण झापे, गौरव नारनवरे, मूल येथील डॉ. विनोद चौधरी, माजी तंटामुक्त अध्यक्ष पांडुरंग बावनकर, सहदेव चौधरी, रवींद्र चौधरी, कमला नन्नावरे, गोरजाई पतसंस्था अध्यक्ष जिजा राणे, सचिव कमला रणदिवे, पळसागाव सरपंचा दडमड, श्रावण रंदये, वन परिक्षेत्राधिकारी नारनवरे तसेच मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

वैरागड येथील माँ गोरजाई यात्रा महोत्सव कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आदिवासी माना जमात मंडळ व आदिवासी विद्यार्थी युवक संघटना ग्राम शाखा वाढवना, भगवानपूर व गडचिरोली जिल्हा वाशिम माना जमा बांधव यांनी केले आहे.

# वैरागड येथे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण संपन्न



दैनिक वादळ वार्ता
**वैरागड । प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव मंडळ यांच्या वतीने ग्रामपंचायत जवळील शिवाजी महाराज चौक येथे दि. १९ ते २२ फेब्रुवारी पर्यंत चार दिवसीय राजे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण सोहळा तसेच जयंती निमित्त विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते दि. १९ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी मान्यवरांच्या हस्ते श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले.

श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त पुतळा अनावरण प्रसंगी किसनराव खोब्रागडे शिक्षण संस्था संस्थापक भाग्यवान खोब्रागडे, को. ऑ. सहकारी बँकॉक अध्यक्ष प्रकाश सावकार पोरेड्डीवार, माजी आमदार कृष्णा गजबे, उपविभागीय अधिकारी गडचिरोली जगताप, पोलिस ठाण्याचे ठाणेदार गवते, सामाजिक कार्यकर्ते भोलू सोमनानी, सरपंचा संगीता पेंदाम, उपसरपंच भास्कर बोडणे, सचिन कुळवे, वकील प्रमोद धोंगे, मंचावर उपस्थित मान्यवर तसेच वैरागड, पाठणवडा, मेंढेबोडी आणि परिसरातील शिवभक्त तसेच नागरिक शेकडोच्या संखेने उपस्थित होते.

# गोंडवाना विद्यापीठस्तरिय रग्बी स्पर्धेत सरदार पटेल महाविद्यालय विजयी

दैनिक वादळ वार्ता
**जिवती । प्रतिनिधी**




गोंडवाना विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन मुलींच्या रग्बी स्पर्धेत येथील सरदार पटेल महाविद्यालयाने अजिंक्यपद तर मुलांच्या संघाने रौप्य पदक पटकाविले आहे. गोंडवाना विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन रग्बी स्पर्धा बल्लारपूर येथील गुरुनानक विज्ञान महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेकरिता चंद्रपूर व गडचिरोली परीक्षेत्रातील विविध महाविद्यालयांच्या संघानी सहभाग घेतला.

या रग्बी स्पर्धेत सरदार पटेल महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने अजिंक्यपद पटकाविले. विजेतेपद खेचून आणण्याकरिता मुलींच्या संघात अमीक्षा शेंडे, आरती बारसागडे, परिमिता भंडारकर, ज्योति गोंड, अमीक्षा उइके, रमा यादव, शताब्दी कुंडू, पूजा थलाल, नोकीता साहू, वैष्णवी देशमुख, आचल श्रीरामे, खुशी कोंडागुर्ला आपल्या सुरेख खेळ, रणनीती व कौशल्याचे प्रदर्शन केले. तसेच मुलांच्या संघाने उपविजेतापद पटकाविले. उपविजेतेपद खेचून आणण्याकरिता मुलांच्या संघात शिवम तिवारी, सूरज भगाडे, गौरव धकाते, फरदीन खान, दीपक कडूकर, फैजान खान, शिवम धकाते, रोहित पवार, वेदांत विधाते, महेश भोगेकर, दर्शन मेश्राम, आदित्य मंगरुळकर यांनी आपल्या सुरेख खेळ, रणनीती व कौशल्याचे प्रदर्शन केले.

दरम्यान संघाच्या या यशाबद्दल सर्वोदय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अरविंद सावकार पोरेडीवार कार्याध्यक्ष आ. किशोर जोरगेवार, उपाध्यक्ष सुदर्शन निमकर, सगुणा तलांडी, सचिव प्रशांत पोटदुखे, सहसचिव कीर्तिवर्धन दीक्षित, कोषाध्यक्ष संदीप गड्डमवार, सर्वोदय शिक्षण मंडळचे कार्यकारी सदस्य राकेश पटेल, सुरेश पोटदुखे, जीनेश पटेल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. काटकर उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. कुलदीप आर. गोंड, डॉ. पुष्पांजली कांबळे, प्रा. विकी पेटकर, हनुमंत डभारे, आदित्य मंगरूळकर, प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले

# परसलगोंदी-हेडरीतील धान खरेदी प्रश्न पेटला परसलगोंदी येथे खुल्या जागेत खरेदी सुरू करण्याची मागणी-२६ फेब्रुवारीपासून बेमुद्दत धरणे

दैनिक वादळ वार्ता
**सिरोंचा । प्रतिनिधी**

अहेरी, दि. २० फेब्रुवारी २०२६ : परसलगोंदी व हेडरी गावांतील धान खरेदी केंद्रांवरील गोडाऊन पूर्ण भरल्याने शेतकऱ्यांचे धान खरेदीपासून वंचित राहण्याचा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः परसलगोंदी येथे तात्काळ खुल्या जागेत ओपन प्लॉटवर धान खरेदी सुरू करण्यात यावी, अशी ठाम मागणी ऑल इंडिया किसान सभा अहेरी विधानसभा क्षेत्राने केली आहे.

शासनाच्या किमान आधारभूत किंमत (MSP) धोरणानुसार पात्र व नोंदणीकृत प्रत्येक शेतकऱ्याचे संपूर्ण धान खरेदी करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र गोडाऊनमध्ये जागा नसल्याचे कारण पुढे करून खरेदी थांबविण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. किसान सभेने स्पष्ट केले आहे की, गोडाऊन अपुरे पडत असल्यास पर्यायी व्यवस्था करून - विशेषतः परसलगोंदी येथे खुल्या जागेत - खरेदी प्रक्रिया अखंडितपणे सुरू ठेवणे बंधनकारक आहे. दोन दिवसांच्या आत परसलगोंदी येथे खुल्या जागेत खरेदी सुरू करण्याचे लेखी आदेश न दिल्यास दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्व शेतकरी ट्रॅक्टर व बैलबंडीने धान अहेरी येथील उपप्रादेशिक कार्यालयात आणून कार्यालयासमोर टाकत बेमुद्दत धरणे आंदोलन सुरू करण्यात येईल, असा ठाम इशारा देण्यात आला आहे.

यावेळी किसान सभेचे अध्यक्ष कॉ. सचिन मोतकुरवार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की,

चड्ड ही शेतकऱ्यांची हक्काची किंमत आहे, दान नाही. गोडाऊन भरल्याचे कारण देऊन खरेदी थांबविणे आम्हाला मान्य नाही. परसलगोंदी येथे तात्काळ खुल्या जागेत खरेदी सुरू झाली पाहिजे. अन्यथा शेतकरी आपल्या हक्कासाठी २६ फेब्रुवारीपासून रस्त्यावर उतरतील आणि संघर्ष अधिक तीव्र करतील.

कॉ. सूरज जककुलवार सचिव, कॉ. रितेश जोई तालुका सहसचिव तसेच इतर सदस्य व शेतकऱ्यांनी आंदोलनात सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा देण्याचा निर्धार करत किसान सभेने प्रशासनाला तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याचे आवाहन केले आहे.

# कुरखेडा महामार्ग बांधकाम रेंगाळ

## बबलू हुसैनी यांचा कंत्राटदाराला कडक अल्टिमेटम-८ दिवसांत काम सुरू,महिन्याभरात पूर्ण न केल्यास १ एप्रिलपासून चक्काजाम व बाजार बंद!

दैनिक वादळ वार्ता
**देसाईगंज । प्रतिनिधी**



कुरखेडा शहरातील निकृष्ट दर्जाच्या महामार्ग बांधकामामुळे दोन वर्षांपासून नागरिकांचे हाल सुरू असून, कंत्राटदाराच्या मनमानीमुळे व्यापार ठप्प झाला आहे आणि आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. याबाबत नगर पंचायत उपाध्यक्ष तथा बांधकाम सभापती बबलू हुसैनी यांनी आज जोरदार आक्रमक भूमिका घेतली. नगर पंचायत कार्यालयात आयोजित विशेष पत्रकार परिषदेत त्यांनी राजश्री कंपनीला थेट इशारा दिला की, येत्या आठ दिवसांत बांधकाम सुरू करून महिन्याभरात संपूर्ण रस्ता व नाली बांधकाम पूर्ण न केल्यास १ एप्रिलपासून चक्काजाम व संपूर्ण बाजारपेठ बंद करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

पत्रकार परिषदेत बबलू हुसैनी म्हणाले, मागील दोन वर्षांपासून महामार्गाचे काम संथ गतीने चालू आहे. धुळीने व्यापारी व नागरिक हैराण झाले आहेत. रस्त्यावर खड्डे, उखडलेले डांबरी, नाल्यांचे काम अपूर्ण असल्याने पावसाळ्यात पाणी साचून आरोग्य समस्या निर्माण होत आहेत. राजश्री कंपनीला हे कंत्राट देण्यात आले, पण ही कंपनी मजुरांचे पगार देण्यात आणि बांधकाम साहित्य पुरवण्यात पूर्णतः असमर्थ आहे. पात्रता नसलेल्या नवख्या कंपनीला एवढे मोठे कंत्राट देणे हा प्रकारच गंभीर आहे.

ते पुढे म्हणाले, जर कंत्राटदाराकडे पैसे व साहित्य नसेल तर आम्ही कुरखेड्यात 'भीक मांगो आंदोलन' करून आर्थिक सहायता गोळा करू आणि स्वतः काम पूर्ण करू. पण आता पुरे झाले! आठ दिवसांत काम सुरू झाले नाही आणि महिन्याभरात पूर्ण झाले नाही तर १ एप्रिलपासून शहर बंद करणार. चक्काजाम, बाजार बंद, सर्व प्रकारचे आंदोलन करण्यात येईल. नगर पंचायत उपाध्यक्ष बबलू हुसैनी यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे शहरातील नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये मोठी चर्चा सुरू झाली आहे. अनेकांनी त्यांचे स्वागत करताना म्हटले की, अखेर कोणीतरी नागरिकांच्या बाजूने बोलले. दोन वर्षांपासून रस्त्याच्या नावाखाली फक्त धूळ आणि खड्डेच दिसत आहेत. व्यापार बंद झाला आहे, मुलांचे शिक्षण, आजारपण, दैनंदिन हाल सुरू आहेत.

स्थानिक व्यापारी संघटनेनेही बबलू हुसैनी यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला आहे. त्यांनी सांगितले की, रस्त्यामुळे दुकाने बंद पडली आहेत. ग्राहक येत नाहीत. कंत्राटदाराने आता तरी जागे व्हावे, अन्यथा आम्हीही आंदोलनात सहभागी होऊ.

बबलू भाई हुसैनी यांच्या या ठाम भूमिकेमुळे रेंगाळलेले महामार्ग बांधकाम आता मार्गी लागेल आणि शहरातील रस्ते व नाल्या लवकरात लवकर पूर्ण होतील, अशी आशा सर्व नागरिक व्यक्त करत आहेत. दरम्यान, जिल्हा प्रशासनानेही याकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे

# MPS इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंती व भव्य बक्षीस वितरण सोहळा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**हदगाव । प्रतिनिधी**

हदगाव स्थानिक चझड इंग्लिश स्कूल येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती अत्यंत उत्साहात आणि प्रेरणायुक्त वातावरणात साजरी करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधून शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा 'भव्य बक्षीस वितरण सोहळा' देखील मोठ्या थाटात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात आणि मान्यवरांची उपस्थिती पाहुण्यांमध्ये एडवोकेट दिगंबर सूर्यवंशी सर, व काळे सर यांच्या हस्ते

कार्यक्रमाचा प्रारंभ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सचिन जाधव हे होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा आविष्कार

शिवजयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यात प्रामुख्याने:

* प्रभावी भाषणे: विद्यार्थ्यांनी महाराजांच्या युद्धनीतीवर आणि प्रशासनावर प्रकाश टाकला.
* पोवाडे व देशभक्तीपर गीते: शिवरायांच्या पराक्रमाचे वर्णन करणाऱ्या पोवाड्यांनी उपस्थितांमध्ये चैतन्य भरले.
* नाट्यप्रयोग: ऐतिहासिक प्रसंगांच्या सादरीकरणाने प्रेक्षकांची मने जिंकली.

गुणवंतांचा गौरव

या सोहळ्यात शैक्षणिक वर्षभरात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये:

* शैक्षणिक गुणवत्ता: परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार.
* विविध स्पर्धा: वक्तृत्व, चित्रकला, निबंध आणि क्रीडा स्पर्धांमधील विजेत्यांना प्रमाणपत्रे व पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

अध्यक्षीय मार्गदर्शन

अध्यक्षीय भाषणात सचिन जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शिवाजी महाराजांचे जीवन शौर्य, शिस्त आणि देशप्रेमाचा वस्तुपाठ आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता महाराजांचे गुण आत्मसात करावेत. शिक्षण हेच खरे सामर्थ्य असून परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावरच तुम्ही यश संपादन करू शकता.

यशाची सांगता

शाळेच्या मुख्याध्यापकांनी प्रास्ताविकातून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला कशी मदत होते, हे स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता झाली.





# राष्ट्रीयकृत बँक आणि मागासवर्गीय महामंडळांच्या कर्ज वाटपाचा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतला आढावा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**



महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ ; लिडकॉम आदी मागासवर्गीयांच्या आर्थिक विकास महामंडळाद्वारे देण्यात येणा-या कर्जाला एनएसएफडीसी कडे राज्य सरकारने ३०० कोटीची हमी देण्याचा निर्णय घेतलेला आहे. या ३०० कोटीच्या निर्णयाची फाईल राज्य सरकारच्या अर्थखात्यात प्रलंबित आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देणे अत्यंत आवश्यक आहे तसेच मागासवर्गीय उद्योजकांनाही स्वयंरोजगारासाठी कर्ज देणे गरजेचे आहे. मात्र राज्य सरकार जोपर्यंत ३०० कोटीची हमी एनएसएफडीसीकडे देत नाही तोपर्यंत कर्ज वितरीत होत नाही. त्यामुळे राज्य सरकारने घेतलेल्या हमीच्या निर्णयाची अंमलबजावणी झाली पाहिजे. त्यासाठी अर्थखात्याच्या अधिका-यांनी याबाबत प्रलंबित फाईल त्वरित निकाली काढली पाहिजे. याबाबतचे निर्देश रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी आयोजित केलेल्या बैठकीत समाजकल्याण अधिका-यांना दिले.

मुंबईत सहयाद्री अतिथी गृह येथे विविध राष्ट्रीय बँका, मागासवर्गीय महामंडळांच्या कर्ज वाटपाचा आढावा घेणा-या बैठकीचे आयोजन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेत करण्यात आले होते. यावेळी बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, या राष्ट्रीय बँकांचे प्रमुख आणि मागासवर्गीय मंडळांचे अधिकारी उपस्थित होते.

# हानेगाव जिल्हा परिषद हायस्कूल येथे दहावीच्या परीक्षा सुरळीत

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

देगलूर तालुक्यातील जिल्हा परिषद हायस्कूल हानेगाव येथे सुरू असलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षा शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने पार पडत आहेत. परीक्षा केंद्र क्रमांक ५१०३ अंतर्गत हे केंद्र कार्यरत असून केंद्रप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली सर्व व्यवस्था काटेकोरपणे राबविण्यात येत आहे.




परीक्षा केंद्र संचालक म्हणून देशमुख एम.एस.सर यांनी जबाबदारीने नियोजन करून प्रत्येक परीक्षा हॉल मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवून परीक्षा पार पाडण्यासाठी विशेष दक्षता घेतली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मंडळ अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, तसेच मरखेल पोलीस ठाण्याचे अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. या केंद्रावर ३०९ विद्यार्थ्यांची नोंदणी असून संपूर्ण विद्यार्थी उपस्थित होते. एकुणच जिल्हा परिषद हायस्कूल हानेगाव प्रशासन व पोलीसांच्या समन्वयातून परीक्षा आदर्श पध्दतीने पार पडत असल्याचे समाधान व्यक्त होत आहे.तसेच मरखेल पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक मा.श्री रविंद्र हुंडेकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विलास पवार, पोलीस हेड कॉन्स्टेबल इरन्ना कंतेवाड, पोलीस कॉन्स्टेबल नारायण येगांले, परमेश्वर बेलकर, मधुकर केंद्रे, संदीप बोदमेवाड, होमगार्ड सतीश कांबळे, यादव गायकवाड,देवबा वाघमारे,इलियाज शेख, दीपक चौधरी, वंदना वाघमारे,विमल फरसे, योगेश हनुमाने, सुनील कांबळे यांच्या कडून चौख बंदोबस्त तैनात करण्यात आले.

# खुशी सेवाभावी संस्थेच्या वतीने शिवजयंतीनिमित्त महाप्रसादाचे वाटप

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**



श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त खुशी सेवाभावी संस्थेच्या वतीने महाप्रसाद अन्नदानाचे आयोजन यशस्वीपणे संपन्न झाले. संस्थेचे अध्यक्ष तथा नगरसेवक एकनाथ (बबलू) टेकाळे व अनिल टेकाळे यांच्या पुढाकाराने झालेल्या या उपक्रमाला हजारो शिवभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाप्रसादाच्या शुभारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. एकनाथ टेकाळे यांच्या हस्ते नारळ फोडून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. व यावेळी बालाजी पाटील खतगावकर (माजी प्रशासकीय अधिकारी, नगराध्यक्षा विजयमाला बालाजी टेकाळे, लक्ष्मीकांत पदमवार (माजी नगराध्यक्ष) बालाजी टेकाळे (माजी उपनगराध्यक्ष), अंकुश देसाई उपनगराध्यक्ष, पोलीस निरीक्षक मारोती मुंडे, बुद्धू टेकाळे, नामदेव पाटील थडके (शिवजन्मोत्सव समिती अध्यक्ष), नगरसेवक नंदू शाखावर, नगरसेवक सुमंत कांबळे, बालाजी थडके, देगावकर, द्याळे आप्पा, यांच्या हस्ते महाप्रसादाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय ! अश्या घोषणा देण्यात आल्या. या कार्यक्रमात शिवभक्त, सामाजिक कार्यकर्ते आणि महिलांसह हजारो नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष नामदेव पाटील थडके यांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक करत खुशी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष एकनाथ (बबलू) टेकाळे यांचे आभार मानले. भारतीय संस्कृतीनुसार अन्नदान हे श्रेष्ठदान मानले जाते, आणि एकनाथ (बबलू) टेकाळे यांनी शिवभक्तांना अन्नदान करून हे पुण्यकर्म केले आहे, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी महाप्रसाद कार्यक्रमाला खुशी सेवाभावी संस्थेचे अनिल टेकाळे, संपादक गजानन टेकाळे, संतोष नाईकवाड, गंगाधर उल्लेवार, पंकज कद्रेकर, शिरू महाराज, संजू बंधमवार, बालू पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अखेरीस एकनाथ (बबलू) टेकाळे यांनी महाप्रसादाचा लाभ घेतलेल्या सर्व शिवभक्तांचे आणि सहकाऱ्यांचे आभार मानले.

# जैन इंग्लिश स्कूल पाचोड येथे शिवजयंती उत्साहात साजरी



दैनिक वादळ वार्ता
**पाचोड । प्रतिनिधी**

येथील जैन इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली शाळा परिसर भगव्या पतकांनी ऐतिहासिक देखाव्यांनी व प्रेरणादायी घोष वाक्यांनी सजविन्यात आला होता

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरला तो रायगड किल्ल्याचा देखावा विद्यार्थ्यांनी अत्यंत कल्पकतेने व परिश्रमपूर्वक रायगड किल्ल्याची प्रतिकृती साकारली होती ज्यामुळे उपस्थिताना इतिहासाची अनुभूती मिळाली विद्यार्थ्यांनी नाटकेत छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण स्वराज्य स्थापनेची शपथ अब्दुल खान वध आग्रा येथे सुटका आणि राज्यभिषेक अशा महत्त्वपूर्ण घटकावर प्रकाश टाकला या कार्यक्रमात नृत्य पोवाडे प्रभावी भाषणे आणि ऐतिहासिक वेशभूषा सादरीकरण करण्यात आले . कार्यक्रमास प्रमुख पाहुणे जिल्हा परिषद सदस्य शिवराज भुमरे तथा पाचोड सरपंच यांच्यासह शाळेचे अध्यक्ष जयकुमार बाकलीवाल संचालक सुयोग बाकलीवाल मुख्याध्यापिका सविता उंटगिरे यांची उपस्थिती होती.सूत्रसंचालन सातवीतील विद्यार्थिनी मेघना पन्हाळकर व अनुश्री तवार यांनी केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी कविता झंगळे भारतीय जाधव योगिता वाघ संध्या कासार ज्योती जगताप मोनाली राठोड कोमल पाचोडे आरती कारके चैतन्य नाझरकर सुदर्शन खिल्लारे रोहित गायकवाड फोटोग्राफर किरण वाघ किशोर शिंदे सुरेश मुंडे रईस पठाण सुजय शेळके शुभम काटे व सिद्धार्थ शेळके सर यांनी सहकार्य केले

# हिमायतनगर शहरात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी




दैनिक वादळ वार्ता
**हिमायतनगर । प्रतिनिधी**

शहरात श्री परमेश्वर मंदिर समोरिल पटागणात सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समीतीकडुन छत्रपती शिवाजी महाराज याची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

जयंती निमित्त तालुक्यातील शालेय विध्यार्थ्याठी सामान्य ज्ञान विषयावर स्पर्धा परिक्षा घेण्यात आली या परिक्षेला असंख्य विध्यार्थ्यानी आपला सहभाग नोंदवला प्रथमता कार्यक्रमाची सुरूवात गटविकास अधिकारी केशव मेकाले यांनी शिवाजी महाराजाच्या प्रतिमेच पुजन करून केली या कार्यक्रमास हदगांव हिमायतनगर विधानसभेचे माजी आमदार व नगरपंचायतचे नगराध्यक्ष नगरसेवक यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन केले यावेळी माधवराव पाटील जवळगावकर यांनी सार्वजनिक शिवजयंती महोत्सन समीतीचे पदाधिकारी व कार्यकत्यानी शालेय विध्यार्थ्यासाठी राबवलेल्या उलेखनिय उपक्रमाचे कौतुक करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी जय भवानी जय शिवाजी या जयघोषाने सपुर्ण शहर दुमदुमले हजारोच्या संख्येने शिवभक्त या कार्यक्रमास उपस्थित होते.

# डॉ.बि.बि.चव्हाण मिलिटरी स्कूल येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



दैनिक वादळ वार्ता
**खुलताबाद । प्रतिनिधी**

आज ऊ. इ. इ. उहरींरप Military School and academy खांडी पिंपळगाव मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व अभिमानाने साजरी करण्यात आली. या प्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी आकर्षक शिववेशभूषा धारण करून शिवकालीन पराक्रमावर आधारित विविध नृत्य सादर केले. तसेच विद्यार्थ्यांनी घोडेस्वारीचेही उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमप्रसंगी संचालक डॉ. आदिनाथ वाकळे पाटील उपस्थित होते. त्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या महान कार्यावर, स्वराज्य स्थापनेतील योगदानावर व त्यांच्या आदर्श जीवनमूल्यांवर सखोल प्रकाश टाकला.कार्यक्रमात उपप्राचार्य अविनाश थिटे उपप्राचार्या रिना सूर्यवंशी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. त्यांच्या मार्गदर्शन व सहकार्यामुळे कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, प्रेरणादायी व संस्मरणीय ठरला.

# इस्लाम धर्माचा पवित्र रमजान महिन्यात १० वर्षीय जोहर मोहसीन खान ने ठेवला आयुष्यातील पहिला रोजा

दैनिक वादळ वार्ता
**किनवट । प्रतिनिधी**

इस्लाम धर्मात पवित्र रमजान या महिन्याला अनन्य महत्व प्राप्त आहेया महिन्यात सर्वच बांधव मुस्लिम यांच्यावर वयाच्या दहाव्या वर्षा पासून रोजा (उपवास) फर्ज (सक्तीचें) असतात. लहानपासून मोठ्यापर्यत या महिन्यांमध्ये ३० दिवस रोजा धरत असतात. पालकांचे पाहून लहान मुलांनाही रोजा धरण्याची लालसा निर्माण होते. त्यामुळे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा (उपवास) धरतात. अशाच प्रकारे किनवट तालुक्यात चिखली बु येथील राहणारे जोहर मोहसीन खान किनवट प्रतिनिधी दैनिक लोकनेता शेख शौकत यांचे नातू १० वर्षाचा जोहर मोहसीन खान यांनी आपल्या जीवनात पहिला आणि रमजान महिन्याच्या पहिला रोजा

गुरुवार १९ फेब्रुवारी २०२६ रोजी पूर्ण केला आहे. मुस्लिम समाजात पवित्र असणाऱ्या या महिन्यात संपूर्ण महिनाभर दिवसभर पाणी न पिता उपवास ठेवला जातो. यावर्षी रोजा (उपवास) सकाळी



५.२० वाजता सुरू होत असून संध्याकाळी ६.२२ ला रोजा सोडण्याची वेळ आहे. या १३ तासा पेक्षा जास्त वेळचा उपवास असल्याने या उष्णतेचा मोठ्या माणसांनादेखील खूप त्रास होतो. त्यात या चिमुकल्याने पहिला रौजा ठेवून आपल्या आयुष्याची सुरुवात एक चांगल्या प्रकारे व्हावी या हेतूने उपवास ठैवला. त्यामुळे जोहर मोहसीन खान यांचे सर्व कौतुक होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077